# जिल्हाधिकारी यांजकडुन
# बीड नगर परिषद, जिल्हा बीड

क्र. २०१६/जि.बी./डेस्क-१/एमयुएन/००७ दिनांक : ११.०८.२०१६

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/न.प. २०१६/प्र.क्र.१०/का-६ दिनांक १५ जुन २०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) चे कलम १०(१) खाली बीड जिल्हयाचा जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचिमध्ये दर्शविलेल्या प्रमाणे **बीड नगर परिषद** क्षेत्र जितक्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चीत करण्याचे आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याच प्रमाणे स्त्रीयांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्गातील स्त्रीयांसाठी) जागा राखुन ठेवण्यात येतील ते प्रभाग दर्शविणारा क्रमांक २०१६/जी.बी./डेस्क-१/एमयुएन/००१ दि. ०५.०७.२०१६ च्या आदेशाचा प्रारुप मसुदा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम १० (१) च्या परंतुकामध्ये निश्चित केलेल्या पध्दतीप्रमाो उक्त नगर परिषद क्षेत्रातील रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत आला होता. त्यास अनुसरुन आलेल्या हरकतींचा सर्वंकष विचार करुन त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या हरकतीवर सुनावणी घेऊन मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना अभिप्राय सादर करुन मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी पत्र क्र. २०१६ न.पा.प्र. निवडणूक कावी / १३६ दि. २९.०७.२०१६ अन्वये मान्यता दिल्यानुसार मी,नवल किशोर राम बीड जिल्हयाचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम १० पोटकलम (१) अन्वये प्रदान कलेल्या अधिकाराचा वापर करुन निम्नोक्त आदेश देत आहे.

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) च्या कलम ९ पोटकलम (२) अन्वये मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश क्र. २०१६/न.प.प्र./आस्था-२/कावि दि. १४.०५.२०१६ अन्वये त्यांनी बीड नगर परिषदेच्या बाबतीत खाली दर्शविल्या प्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी राखुन ठेवावयाच्या जागा व स्त्रीयांसाठी (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रीयांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) निश्चित केलेल्या आहेत.

(१) निवडावयाची सभासदांची संख्या :- ५०

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या
- (अ) अनुसूचित जाती :- ०६
- (ब) अनुसूचित जमाती :- ००
- (क) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग :- १४

(३) महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) :- २५

(४) उपरोक्त क्रमांक ३ पैकी वरील क्रमांक २ (अ), (ब) व (क) येथील जागांमध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखुन ठेवावयाच्या जागांची संख्या खालील प्रमाणे राहिल
- (अ) अनुसूचित जाती :- ०३
- (ब) अनुसूचित जमाती :- ००
- (क) नागरीकांचा मागास वर्ग प्रवर्ग :- ०७

(५) महिलांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या :- १५
(अनुक्रमांक ३ समोरील नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक ४ अ, ब, व क समोरील नमुद केलेल्या जागा)

(६) सर्वसाधारण (अनारक्षीत) जागांची संख्या :- १५
(अनुक्रमांक १ समोर नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक २ अ, २ ब, २ क व अनुक्रमांक ५ समोरील नमुद केलेल्या जागा)

२. त्या अर्थी, आता मा.अवर सचिव राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/नपा-२०१६/प्रक्र.१०/का-६ दि. १५ जुन २०१६ नुसार व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०, पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, बीड याद्वारे **बीड नगर परिषद** क्षेत्र जितक्या भागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती व जनगणना २०११ नुसार प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या आणि त्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या या आदेशाच्या अनुसूचि मध्ये दर्शविल्या प्रमाणे निश्चित करीत असुन ज्या प्रभागामध्ये यथास्थिती (अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी व महिलांसह) जागा राखुन ठेवण्यात येतील हे प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

(७) या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

स्थळ :- बीड
दि. ११/०८/२०१६

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी, बीड.

अनुसूची

नगर परिषद बीड सार्वत्रिक निवडणूक २०१६

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसुचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | २ | | | ३ | ४ | ५ |
| १ | शाहु नगर, कॅनॉल रोड | ८१७३ | ९७८ | ८२ | १-अ<br>१-ब | उत्तर - जालना रोड ते न.प.हद्द ते शिंदे नगर<br>पुर्व - जालना रोड ते, गया नगर ते स.नं. ९४ र्ख बॉर्डर पर्यंत जालना<br>दक्षिण - जालना रोड ते कॅनॉल रोड शंकर वाघ यांचे दुकाना पर्यंत व पांगरी रोड, तसेच पिंपरगव्हाण रोड<br>पश्चिम - स.न. २९ व शिंदे नगर न.प. हद्द पर्यंत | १अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>१ब- सर्वसाधारण |
| २ | सावतामाळी चौक | ८७४४ | १५८९ | ८५ | २-अ<br>२-ब | उत्तर - जालना रोड ते न.प.हद्द बिंदुसरा नदी पर्यत<br>पुर्व - न.प. हद्द ते बिंदुसरा नदी मागे गिता कन्या शाळा<br>दक्षिण - नविन पुल सुभाष रोड ते माळीवेस, सावरकर कॉलेज गल्ली ते सारडा सेंन्ट्रलची उत्तर बॉर्डर पर्यंत<br>पश्चिम - सारडा सेंन्ट्रल ते जिजामाता चौक व शिवशारदा ते जालना रोड न.प. हद्द | २अ-अनुसूचित जाती<br>२ब-सर्वसाधारण महिला |
| ३ | विप्र नगर एम.आय.डी.सी. | ८३६७ | १८४६ | ४९ | ३-अ<br>३-ब | उत्तर - बिंदुसरा नदी न.प. हद्द ते एम.आय.डी.सी. रोड<br>पुर्व - खंडेश्वरी रोड पुरग्रस्त कॉलनी ते काळा हनुमान ठाणा रोड<br>दक्षिण - काळा हनुमान ठाणा ते संतोषी माता मंदीर पर्यंत व नदी<br>पश्चिम - संतोषी माता मंदीर ते एम.आय.डी.सी. हद्द व न.प. हद्दी पर्यत | ३अ-अनुसूचित जाती महिला<br>३ब-सर्वसाधारण |
| ४ | नागोबा गल्ली, | ८७२४ | ३५६५ | ३१ | ४-अ<br>४-ब | उत्तर - खंडेश्वरी मंदीर ते नाथापूर रोड पर्यंत<br>पुर्व - नगर परिषद हद्द, पुरग्रस्त कॉलनी ते नाळवंडी रोड पर्यंत<br>दक्षिण - नाळवंडी रोड ते इदगा रोड लोणार पुरा चौक पर्यंत<br>पश्चिम - लोणार पुरा चौक ते काळा हनुमाण ठाणा पर्यंत | ४अ-अनुसूचित जाती<br>४ब-सर्वसाधारण महिला |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसुचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| ५ | करीम पुरा, | ७६५१ | ३६४ | २३ | ५-अ<br>५-ब | उत्तर - संतोषी माता मंदिर विठ्ठल मंदीर चौक मार्ग काळा हनुमान ढाणा<br>पुर्व - काळा हनुमान ठाणा महाविर चौक, लोणार पुरा-लोणार पुरा रोड ते खडकपुरा<br>दक्षिण - खडकपुरा पोष्ट ऑफीस, धनगर पुरा गल्ली, मांगवाडा ते कुंभार वाडा रोड पर्यंत<br>पश्चिम - चांभारवाडा ते अंबेडकर पुतळा-बिंदुसरा नदी ते संतोषी माता मंदीर | ५अ-सर्वसाधारण महिला<br>५ब-सर्वसाधारण |
| ६ | जुना बाजार | ७२७२ | ३९ | १६९ | ६-अ<br>६-ब | उत्तर - सुभाष रोड पूल ते पात्रुड गल्ली पर्यंत<br>पुर्व - सुभाष रोड पूल ते बिंदुसरा नदी मार्गे श्रीकृष्ण मंदीर पर्यंत<br>दक्षिण - श्रीकृष्ण मंदीर रस्ता ते जुना बाजार कागदी दरवाजा रोड<br>पश्चिम - कागदी दरवाजा ते जुना बाजार, बोबडेश्वर गलली, जटाश्ंकर गल्ली ते पात्रुड गल्ली पर्यंत | ६अ-सर्वसाधारण महिला<br>६ब-सर्वसाधारण |
| ७ | टिळक रोड | ७७३२ | १५१ | ४७ | ७-अ<br>७-ब | उत्तर - सुभाष रोड, माळीवेस वैद्य मोबाईल शॉपी पर्यंत<br>पुर्व - सुभाष रोड, पाथरुड गल्ली बोबडेश्वर गल्ली जटाशंकर गल्ली रोड पर्यंत<br>दक्षिण - जुना बाजार रोड ते बलभिम चौक ते कारंजा रोड पर्यंत<br>पश्चिम - कारंजा टॉवर ते जुनी भाजी मंडई डॉ. इलियास हाश्मी ते सिटी पोलिस स्टेशन गोरे पान स्टॉल ते सेंन्ट्रल नाका व बोकरीया सिमेंट कॉर्नर ते सुभाष रोड | ७अ-नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>७ब-सर्वसाधारण महिला |
| ८ | नविन भाजी मंडई | ७९०९ | ३६२ | ८२ | ८-अ<br>८-ब | उत्तर - जालना रोड ते जिजामाता चौक, सारडा सेंन्ट्रल उत्तर बॉर्डर ते सावरकर कॉलेज ते सटवाई मैदान रोड पर्यंत<br>पुर्व - माळीवेस कबाड गल्ली बोकरीया सिमेंट कॉर्नर ते नाला ते सिटी पोलिस स्टेशन ते डॉ. इलियास हाशमी ते जुनी भाजी मंडई ते कारंजा टॉवर<br>दक्षिण - कारंजा टॉवर ते शिवाजी चौक,राजुरी वेस मार्गे<br>पश्चिम - शिवाजी चौक ते अण्णभाउ साठे चौक मार्गे शिवशारदा बिल्डींग पर्यंत | ८अ-नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>८ब-सर्वसाधारण महिला |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| ९ | शाहु नगर पार्ट हनुमान चौक, | ८५९० | १०६१ | ५० | ९-अ<br>९-ब | उत्तर - स.प. ९४ ची हद्द ते चाटे निवास बँक साईड ते शंकर वाघ किराणा दुकान<br>पुर्व - जालना रोड ते कार्तिकी लॉज पर्यंत<br>दक्षिण - कार्तिकी लॉज ते अंबिका चौक सम्राट चौक मार्ग<br>पश्चिम - अंबिका चौक ते कॅनॉल रोड मार्ग शंकर वाघ किराणा दुकान पर्यंत | ९अ-नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>९ब-सर्वसाधारण |
| १० | क्रांती नगर, / श्रीराम नगर | ८३९२ | ९३९ | १०२ | १०-अ<br>१०-ब | उत्तर - एस.टी.वर्कशॉप ते अंबिका चौक, पांगरी रोड शाळा पर्यंत<br>पुर्व - एस.टी.वर्कशॉप ते शिवाजी चौक पर्यंत<br>दक्षिण - शिवाजी चौक ते आय.टी.आय. दक्षीण बाजू कंपाऊंड पर्यंत<br>पश्चिम - नगर रोड ते आय.टी.आय. कंपाऊंड सर्कस ग्राऊंड ते पिंपरगव्हाण रोड ते पांगरी रोड आंबेडकर शाळे पर्यंत | १०अ-नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>१०ब- सर्वसाधारण |
| ११ | अमराई भक्ती कंन्स्ट्रक्शन | ८२८९ | ५०० | ७६ | ११-अ<br>११-ब | उत्तर - पिंपरगव्हाण रोड स.प. ६६ ते कर्परा नदी पर्यंत<br>पुर्व - पिंपरगव्हाण रोड ते सर्कस ग्राऊंड मार्गे आय टी आय कंपाऊंड ते नगर रोड पर्यंत<br>दक्षिण - नगर रोड ते कप्रंरा नदी पर्यंत<br>पश्चिम - कर्परा नदी पूल ते नदी मार्गे पिंपरगव्हाण रोड | ११अ-नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>११ब- सर्वसाधारण |
| १२ | रोशन पुरा, ग्रामसेवक कॉलनी | ८३१० | ५९६ | ३८ | १२-अ<br>१२-ब | उत्तर - नगर परिषद हद्द<br>पुर्व - कर्परा नदी न.प. हद्दीपासून ते अंकुश नगर पर्यंत<br>दक्षिण - च-हाटा रोड व न.प. हद्द<br>पश्चिम - न.प. हद्द च-हाटा रोड ते नगर रोड | १२अ-सर्वसाधारण महिला<br>१२ब- सर्वसाधारण |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| १३ | चाणक्य पुरी | ८५८७ | १५९० | १९३ | १३-अ<br>१३-ब | उत्तर - शिवाजी चौक ते नगर नाका मार्गे कर्परा नदी पर्यंत<br>पुर्व - शिवाची चौक ते बार्शी रोड मार्गे नवगण कॉलेज रोड पर्यंत<br>दक्षिण - बार्शी रोड ते नवगण कॉलेज, कॅनॉल राड चौक आशा टॉकीज धानोरा रोड, ते चऱ्हाटा रोड ते कर्परा नदी<br>पश्चिम - आशा टॉकीज ते राजीव गांधी नगर कर्परा नदी चऱ्हाटा रोड पूल ते नगर रोड कर्परा नदी पुला पर्यंत | १३अ-अनुसूचित जाती<br>१३ब- सर्वसाधारण महिला |
| १४ | शहेशाह नगर | ८००९ | ७१३ | १५१ | १४-अ<br>१४-ब | उत्तर - शिवाजी चौक ते राजूरीवेस डीसीसी बँके पर्यंत<br>पुर्व - डीसीसी बँकराजूरी वेस ते तेरवी लाईन लेंडी रोड लक्ष्मण नगर डीपी रोड पर्यंत<br>दक्षिण - लेंडी रोड ते आत्तार कॉम्पलेक्स डीपी रोड बार्शी रोड (हायवे रोड) पर्यंत<br>पश्चिम - आत्तार कॉम्प्लेक्स (हायवे रोड) ते शिवाजी चौक पर्यात | १४अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>१४ब- सर्वसाधारण |
| १५ | राजुरी वेस / कारंजा | ७१३६ | ६५० | ५९ | १५-अ<br>१५-ब | उत्तर - राजूरी वेस ते कारंजा टॉवर मार्ग बलभिम चौक पडकी वेस पर्यंत<br>पुर्व - पडकी वेस ते कागदी दरवाजा रोड ते नजीर यांचे घराचे पुर्व कडुन नाला पर्यंत<br>दक्षिण - फ्रुट मार्केट डीपी रोड ते पुला पर्यंत<br>पश्चिम - लेंडी रोड पुल ते तेरवी लाईन जुने एस.पी. ऑफीसजच्या पाठी मागुन पवळ यांचे घरा समोरुन राजुरी वेस पर्यंत | १५अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>१५ब- सर्वसाधारण महिला |
| १६ | खासबाग | ७१४० | ६४२ | ८८ | १६-अ<br>१६-ब | उत्तर - नंजीर यांचे घरापासून कागदी वेस रोड ते चिंचेच्या झाडापासून श्रीकृष्ण मंदीर पर्यंत दक्षीन बाजू<br>पुर्व - श्री कृष्ण मंदीर ते बिंदूसरा नदी सोमेश्वर मंदीर पूल पर्यंत<br>दक्षिण - सोमेश्वर मंदीर पूलापासून ते लेंडी रोड पूल मार्ग आत्तार कॉम्प्लेक्स पर्यंत<br>पश्चिम - लेंडी रो पुल ते आत्तार कॉम्प्लेक्स व लेंडी रोड ते तकीया मजीद मार्ग लेंडी पूल पर्यंत | १६अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>१६ब- सर्वसाधारण महिला |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| १७ | मालदार पुरा, | ८००० | ८६५ | १४ | १७-अ<br>१७-ब | उत्तर - मारुती मंदीर ते इदगा रोड ते बाबा चौक रोड पाणी टाकीच्या पश्चिम कडून धनगर पुरा, मांगवाडा, कुंभारवाडा, बाजू गल्ली<br>पुर्व - इदगा रोड बाबा चौक मार्ग गोशा नशीन मजीद ते शहेंशाहवली रोड<br>दक्षिण - शहेंनशावली रोड ते ढोरवाडा कंकालेश्वर मार्गे बिंदुसरा नदी<br>पश्चिम - कंकालेश्वर चौक, बिंदुसरा नदी ते चांदणी चोक चांभारवाडा पर्यत | १७अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला<br>१७ब- सर्वसाधारण |
| १८ | इस्लामपुरा | ८०७८ | १६२ | ६८ | १८-अ<br>१८-ब | उत्तर - इदगा रोड ते पाणी टाकी ते नाळवंडी चौक<br>पुर्व - नाळवंडी रोड ते गांधी नगर रोडमार्गे शिवणी रोड पर्यत<br>दक्षिण - नाथापूर रोड ते शिवणी रोड मार्गे शहेन्शावली दर्गा ते चंदन शहा बाबापूल पर्यंत<br>पश्चिम - चंदन शहा बाबा पूलपासुन गोशा नशिन मजिद ते बाबा चौक पाणी टाकीच्या पश्चिम कडील रस्त्याने इदगा रोड | १८अ- सर्वसाधारण महिला<br>१८ब- सर्वसाधारण |
| १९ | गांधी नगर | ८१५७ | ६०५ | २५ | १९-अ<br>१९-ब | उत्तर - नाथापूर रोड ते शास्त्री नगर मधुन नाळवंडी रोड न.प. हद्द पर्यत<br>पुर्व - नाळवंडी रोड ते न.प. हद्दी पासून ते परळी रोड पर्यत न.प. हद्द पर्यत<br>दक्षिण - परळी रोड ते तेलगांव नाका सय्यद अली नगर पर्यत<br>पश्चिम - सय्यद अलीनगर ते शहेंशाहवल कडे शिवणी रोड पर्यत व शिवणी रोड ते नाथापूर राड नाळवंडी चौक ते मेडीकल कॉलेज रोड पर्यत | १९अ- नागरिकांचा मागसवर्ग प्रवर्ग महिला<br>१९ब- सर्वसाधारण |
| २० | मोहम्मदीया कॉलनी मोमीनपुरा | ७९५५ | ६ | ० | २०-अ<br>२०-ब | उत्तर - कंकालेश्वर पूल ते शहेंशाहवली दर्गा ते जुना न.प. हद्द<br>पुर्व - हजरत शहेंशाहवली दर्गा ते जुनी न.प. हद्द ते तेलगांव रोड पर्यत<br>दक्षिण - तेलगाव रोड व दायरा रोड ते न.प. दवाखाना नाल्यापर्यत<br>पश्चिम - तेलगाव रोड ते न.प. दवाखाना मागील नाल्यापर्यत व दायरा रोड ते कंकालेश्वर पूल बिंदूसरा नदी मार्गे | २०अ- नागरिकांचा मागसवर्ग प्रवर्ग<br>१९ब- सर्वसाधारण महिला |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| २१ | अशोक नगर, बीड मामला | ८५२६ | २७० | ३८ | २१-अ<br>२१-ब | उत्तर - बुध्दबेट ते दायरा रोड ते न.प. दवाखाना नाल्यापर्यंत<br>पुर्व - न.प. दवाखाना रोड नाल्यापासून ते तेलगांव रोड पर्यंत<br>दक्षिण - बीड मामला जि.प.शाळा उत्तरे कडील गल्ली ते नाला व ढगे कॉलनी दक्षीण बाजू व सर्व्हे नं. १९ ची उतर बाजू ते बिदुसरा नदी पर्यंत<br>पश्चिम - सोमेश्वर मंदिर पुल ते बिंदुसरा नदी श्रीकृष्ण मंदीर | २१अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>२१ब- सर्वसाधारण महिला |
| २२ | स्वराज्य नगर, | ८६३० | १९१९ | ८३ | २२-अ<br>२२-ब | उत्तर - सोमेश्वर मंदीर पुल ते मारुती एजन्सी व काथीया चे घर ते पोरवाल यांची जमीन व शिवाजी नगर ते पालवन चोक पंचशील नगर मार्ग<br>पुर्व - सोमेश्वर मंदीर नदी पुल ते न.प. हद्दी पर्यंत<br>दक्षिण - बिंदुसरा नदी ते न.प. हद्द चादमारी क्वाईट समोर धानोरा रोड पर्यात<br>पश्चिम - न.प. हद्द ते पालवण चौक व शिवाजी नगर पोरवाल यांचे जमिनी पर्यंत | २२अ- अनुसूचित जाती महिला<br>२२ब- सर्वसाधारण |
| २३ | शिवाजी नगर | ८९८८ | १४७० | १२२ | २३-अ<br>२३-ब | उत्तर - बार्शी रोड ते नवगण कॉलेज मार्गे कॅनॉल रोड चौक ते आशा टॉकीज पर्यंत<br>पुर्व - शिवाजी नगर चौक ते राष्ट्रवादी व सहयाद्री हॉटेल समोर रस्त्यापर्यंत<br>दक्षिण - बार्शी रोड ते काशिद यांचे घर ठाकूर यांचे घर नंतर पोरवाल यांची जमिन व शिवाजी नगर रोड पर्यंत पंचशिल नगर चौक शिवाजी विद्यालय ते धानोरा रोड<br>पश्चिम - आशा टॉकीज रोड ते सहयाद्री गॅरेज समोरील रोड शिवाजी विद्यालयाकडे जाणारा रोड पर्यंत धानोरा रोड | २३अ- सर्वसाधारण महिला<br>२३ब- सर्वसाधारण |
| २४ | संत नामदेव नगर पश्चिम बाजू | ८५९९ | ३०५८ | १७४ | २४-अ<br>२४-ब | उत्तर - धानोरा रोड चऱ्हाटा रोड कर्परा नदी पुल मार्गे मंदिरापर्यंत व अंकुशनगर प्रगणक गट क्र.६२<br>पुर्व - चऱ्हाटा रोड ते धानोरा रोड मार्ग पालवन चौक चांदमारी क्वार्टर न.प.हद्द पर्यत<br>दक्षिण - धानोरा रोड ते कर्परा नदी पर्यंत न.प.हद्द ते कर्परा नदी ते प्रगणक गट क्र.६१/१ पर्यंत<br>पश्चिम - कर्परा नदी ते अंकुशनगर न.प.हद्दीपर्यंत | २४अ- अनुसूचित जाती महिला<br>२४ब- सर्वसाधारण |

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव असल्यास | प्रभागाची एकुण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुचित जमातीची लोकसंख्या | | | जागा क्रमांक | प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पुर्व, दक्षिण, पश्चिम) | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ६ |
| २५ | बार्शी नाका, पापनेश्वर मंदीर | ७२८२ | ११९९ | ३२ | २५-अ<br>२५-ब | उत्तर - - बिंदुसरा नदी ते ढगे कॉलनी रोड सर्व्हे नं. १९ ची उत्तर बाजूर जि.प. शाळा बाजू ते बार्शी नाका पर्यत<br>पुर्व - तेलगाव रोड ते दारुल्लउल्लूम पर्यंत व न.प. हद्द<br>दक्षिण - इमाम पुर रोड ते न.प. हद्द बार्शी नाका ते लॉ कॉलेज पाठीमागे<br>पश्चिम - बिंदुसरा नदी ते ढगे कॉलनी बार्शी रोड पुल मागे | २५अ- नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग<br>२५ब- सर्वसाधारण महिला |
| एकुण २५ प्रभाग | द्वीसदस्वीय प्रभाग- २५<br>त्रीसदस्यीय प्रभाग-०० | | | | जनगणना २०११ नुसार एकुण लोकसंख्या - २०३२४० अनु.जाती लाकसंख्या-२५१३५ अनु.जमाती लोकसंख्या - १८८१ | प्रभागाची लोकसंख्या - सरासरी - कमाल १० % - किमान १० %<br>द्विसदस्यीय प्रभाग - ८१३० - अधिक -८९४३ - कमी -७३१७<br>त्रीसदसीय प्रभाग - ०००० - अधिक -०००० - कमी -०००० | |

टिप :- अनुसूचिमध्ये नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्याच प्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलासह, महिलांसाठी राखून ठेवलेले प्रभाग हे दिनांक ०२/०७/२०१६ रोजी काढलेल्या चिठ्ठया (लॉटस) प्रमाणे निर्दिष्ट करण्यात आलेले आहेत.

२) बीड नगर परिषद क्षेत्रांच्या प्रभागाची सिमा दर्शविणारा नकाशा कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी नगर परिषद बीड कार्यालयात उपलब्ध राहील.

स्थळ :- बीड जि. बीड

दिनांक :- ११/०८/२०१६

OFFICE OF THE COLLECTOR BEED. सत्यमेव जयते

(नवल किशोर राम)

जिल्हाधिकारी, बीड